दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १३९ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.१८ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# तुम्ही फेसबुकवर होता, त्या वेळी मी 'फेस टू फेस' होतो

## या दाढीनेच अहंकाराला गड्डात गाडले-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**कोल्हापूर-या दाढीला तुम्ही हलक्यामध्ये घेऊ नका, या दाढीनेच तुमच्या अहंकाराची गाडी खड्ड्या मध्ये घातली. या दाढीला जनतेचे नाळ देखील कळते. त्यामुळे कुठे कोणाच्या नाड्या जोडलेल्या आहेत, हे देखील मला कळते, पण मी बोलत नाही, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. कोल्हापूरमध्ये शिवसेनेच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले. मला बोलायला लावू नका, नसता सगळेच बाहेर निघेल, अशा इशाराही त्यांनी दिला. बाहेर काय निघेल, याची छोटीशी झलक देतो, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी कोरोना काळात झालेला खिचडी आणि डेड बॉडी बॅगमधील घोटाळ्याचा उल्लेख केला. तुम्ही जेव्हा फेसबुक लाईव्ह करत बसले होतात, तेव्हा एकनाथ शिंदे पीपीई कीट घालून रस्त्यावर फिरत असल्याचेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.**

कोरोना काळात फेसबुक लाईव्ह करणारे कोण आणि रस्त्यावर पीपीई कीट घालून फिरणारे कोण? आपण पाहिले आहे. कोरोना काळात अनेकांचे फोन येत होते, मेसेज येत होते, त्या सर्वांना मी भेटत होतो, जात होतो. मी वारंवार अशा नागरिकांना भेटण्यासाठी गेलो. त्यामुळे मलाही कोरोना झाला. तुम्ही तर कोरोना काळातही खिचडीत पैसे खाल्ले, डेड बॉडीच्या बॅगमध्ये पैसे खाल्ले, आता तुम्ही आमच्यावर का आरोप करतात? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. कोण, कधी, कुठे पैसे घेत होते, याची पुराव्यानिशी सर्व माहिती असल्याचा आरोप एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला. तुम्ही फेसबुक वर खेळत होते त्यावेळी हा एकनाथ शिंदे फेस टू फेस खेळत होता, अशा शब्दात त्यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला. एकनाथ शिंदे घरी बसून उंटावरून शेळ्या हाकणारा मुख्यमंत्री नसल्याचेही ते म्हणाले.माझे कार्यकर्ते हेच माझं टॉनिक आहे, असे मी कायम सांगत असतो. लोकांना भेटल्याशिवाय मी राहू शकत नाही. शिवसैनिक माझे कवच कुंडल आहेत, त्यांच्यापासून मला काहीही धोका नाही. त्यामुळे मी प्रत्येकाला भेटण्याचा प्रयत्न करत असतो. 'मारणे वाले से बचाने वाला बडा होता है' त्यामुळे मी कोणत्याही संकटाला कधीही घाबरत नाही, घाबरलो नाही आणि घाबरणार नाही. बाळासाहेब ठाकरे यांचा विचार घेऊन मी काम करत असल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.ठाणे




जिल्हा आधी पूर्ण काँग्रेसमय होता. एकनाथ शिंदेने पूर्ण ठाणे जिल्हा शिवसेनामय केला असल्याचा दावा एकनाथ शिंदे यांनी केला. नाशिकला निवडणुका असा की कोणत्याही जिल्ह्यात निवडणुका असो. एकनाथ शिंदे सर्व टीम घेऊन शिवसेनेला विजयी करण्यासाठी प्रयत्न करत होता. मात्र, असा कार्यकर्ता तुम्हाला ओळखला नाही का? असा प्रश्न एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना विचारला. जो कार्यकर्ता स्वतःसाठी जगला नाही, त्याला तुम्ही ओळखलं नसल्याचे ते म्हणाले. 'राजा का बेटा राजा नही होगा, जो काम करेगा वो राजा होगा' ही बाळासाहेबांची शिकवण होती. तुमच्यातलाच एखादा कार्यकर्ता मोठा होऊन मुख्यमंत्री होऊन माझ्यासमोर बोलत असेल, तर सर्वात जास्त आनंद मला होईल. या शिवसेनेत कोणी मालक नाही, कोणी नोकर नाही. इथे सर्व शिवसैनिक असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.आगामी काळात होणारी लोकसभा निवडणूक आपल्यासाठी महत्त्वाची असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळे गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवसैनिक, अशा प्रकारे काम करण्याचे आवाहन त्यांनी पदाधिकाऱ्यांना केले. या निवडणुकांमधील काम हेच तुमचे रिपोर्ट कार्ड असेल, असेही ते म्हणाले. यावरच पक्षाचे भवितव्य अवलंबून असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. एकच तिकीट असते, त्यामुळे एखाद्याला तिकीट नाही मिळाले, तरी काही फरक पडत नाही. भविष्यात अनेक निवडणुका असतात. सत्तेमध्ये अनेक पदे असतात. त्यामुळे काळजी करू नका, काम करत रहा, असा सल्ला त्यांनी पदाधिकाऱ्यांना दिला. लोकांसोबत राहणे जास्त महत्त्वाचे आहे. त्यामुळे वारंवार मुंबईला येणं बंद करा, असा सल्लाही त्यांनी पदाधिकाऱ्यांना दिला. लोकांमध्ये राहा असे कळकळीचे आवाहन देखील त्यांनी शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना केलं.आपल्या मागेपुढे फिरणाऱ्यांना पदाधिकारी म्हणून नेमू नका. ज्याच्या मागे मतदार आहेत, अशा काम करणाऱ्या पदाधिकाऱ्याची नेमनूक करण्याचे आवाहन एकनाथ शिंदे यांनी या मेळाव्यात केले. कार्यकर्त्यांना जपा, जो कार्यकर्ता निवडणुकीमध्ये काम करतो, तो निवडणूक झाल्यानंतर ना आवडता होता कामा नये, कारण कार्यकर्ता सर्वात महत्त्वाचा असला पाहिजे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. हा कार्यकर्ता जपायचं काम तुम्ही करा. त्याला मदत करा, त्याला छोट्या छोट्या मदतीची आवश्यकता असते. त्याच्या अडचणीमध्ये त्याला साथ देण्याची त्याची अपेक्षा असते. त्यामुळे त्याच्या अडचणीमध्ये पदाधिकाऱ्यांनी उभे राहायला हवे, असे आवाहन देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

## हळदी येथील युवकांचा शिवसेनेत प्रवेश

**मूल । प्रतिनिधी**

तालुक्यातील हळदी येथील ग्राम पंचायत सदस्य यांचे सहित अनेक युवकांनी बुधवार दि.१४ फेबूवारी रोजी शिवसेना (उ.बा.ठा) गटात प्रवेश घेतला. शिवसेना जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे व युवासेना जिल्हाप्रमुख विक्रांत सहारे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना तालुका प्रमुख प्रशांत गट्टूवार यांच्या नेतृत्वात हळदी येथील युवकांनी पक्ष प्रवेश केला,यावेळी संदीप गिऱ्हे यांनी उपस्थित ग्रामपंचायत सदस्य शरद आत्राम यांच्या गळ्यात दुपट्टा टाकत स्वागत केले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाप्रमुख गिऱ्हे यांनी वाढती बेरोजगारी आणि गावातील असंख्य समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले.लवकरच मुल शहरात उद्धव बाळासाहेब ठाकरे सेवा केंद्र व जनसंपर्क कार्यालय सुरू करणार असून तालुक्यातील गोरगरिबांचे प्रश्न या कार्यालयाच्या माध्यमातून सोडविण्यात येणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी युवा सेना जिल्हा प्रमुख विक्रांत भाऊ सहारे यांनी युवकांचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले.यावेळी युवासेना तालुका प्रमुख



रीतीक संगमवार,शहर प्रमुख आकाश राम उपविभाग प्रमुख रितिक मेश्राम छोटू भाऊ.उपविभाग प्रमुखविनोद चलाख उपस्थित होते,

प्रवेश घेणारे अस्मित चलाख,मोहनदास बुरांडे,घनश्याम लेनगुरे,प्रवीण चलाख,अंकुश वैरागडे, क्षितिज शेडमाके,जितेंद्र आत्राम,सूरज आत्राम,ईश्वर कोठारे,भूषण बुरांडे,चेतन भुरसे,हरिदास बारसागडे,महेश चलाख.अंकुश चलाख,तुषार कोतपांडावार,विनोद पेंदाम,आकाश चलाख, सेवानंद लेनगरे,धूवाकर सिडाम,अक्षय आत्राम.ओमदास नैताम,अतुल आत्राम,रामदास नैताम,मंगेश पेंदांम व आदीनी प्रवेश केला.

## एक दिवसीय पर्यावरण शिबिर संपन्न

### सामाजिक वनीकरण विभागाचा उपक्रम

**चिमूर । प्रतिनिधी**

सामाजिक वनीकरण परिक्षेत्र चिमूर यांच्यातर्फे इको क्लब शाळा करिता एक दिवसीय पर्यावरण शिक्षण शिबिर आंबोली जंगलात शुक्रवारी संपन्न झाला. सामाजिक वनीकरण परिक्षेत्र विभागातर्फे राष्ट्रीय हरित सेवा योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना पर्यावरणाची आवड निर्माण व्हावी, वनाची वन्यप्राण्याची त्यांच्या राहणीमानाची माहिती व्हावी, या उद्देशाने या पर्यावरण शिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. या पर्यावरण शिक्षण शिबिराचे उद्घाटन सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रिया काळे यांच्या हस्ते करण्यात आले.



या पर्यावरण शिक्षण शिबिरात वन्यप्राणी पाऊलखुणा विष्टा या विषयावर तरुण पर्यावरणवादी मंडळाचे सदस्य अमोद गौरकर पक्षी निरीक्षण त्यांची ओळख व माहिती या विषयावर, क्षितिज गडमडे वनस्पतीची ओळख व माहिती या विषयावर, डॉ पवन नागरे यांनी मार्गदर्शन केले. यासोबतच मानव व वन्यजीव संघर्ष कारणे आणि उपाय या विषयावर तरुण पर्यावरणवादी मंडळाचे वीरेंद्र हिंगे, सापाचे महत्व श्रद्धा व अंधश्रद्धा या विषयावर विजय गजभे यांनी मार्गदर्शन केले. निसर्ग खेळ व निसर्ग गीत अमित देशमुख यांनी सादर केले. या शिबिरात विद्यार्थ्यांना कॅप, कापडी पिशवी, वही, पेन व निसर्ग माहिती पुस्तिका देण्यात आली. याच कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे मनोगत घेण्यात आले. या कार्यक्रमात न्यू आदर्श विद्यालय भिसी, शंकरपूर येथील राजीव गांधी कन्या विद्यालय, चिचाळा शास्त्री येथील मानवता विद्यालय, आंबोली येथील श्री राजाराम पाटील वारजूकर विद्यालय च्या प्रत्येकी ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय गजबे प्रास्ताविक प्रिया काळे व आभार वनरक्षक प्रफुल गेडाम यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वनपाल शरद मडावी वनरक्षक बोरकर तथा तरुण पर्यावरण मंडळाचे सदस्य अभी चंदनखेडे, अमर दडवे, सोहेल शेख, रितेश गजबे यांनी परिश्रम घेतले.

## माजी खा.चषक पुरूषांच्या कबड्डी सामन्यांचे हंसराज अहीर यांचे शुभ हस्ते थाटात उद्घाटन

### सतिशल व सन्मित्र क्रीडा मंडळाचे नामांकित क्रीडापटू घडविण्यात मोलाचे योगदान-हंसराज अहीर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

स्थानिक सत्शिल बहूउद्देशीय व्यायाम प्रसारक मंडळ तथा संन्मित्र क्रीडा मंडळ चंद्रपूरद्वारा चंद्रपूर, वणी, आर्णी लोकसभा क्षेत्रातील कबड्डी पटूंसाठी आयोजित 'माजी खासदार चषक' पुरूषांचे भव्य खुल्या कबड्डी सामन्यांचे उद्घाटन दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या शुभहस्ते पार पडले.

विठ्ठल मंदिर वार्डातील टागोर शाळेच्या पटांगणात दि. १६ ते १८ फेब्रुवारी पर्यंत आयोजित या पुरूषांच्या कबड्डी सामन्यांच्या उद्घाटन समारंभास भाजपा नेते विजय राऊत, खुशाल बोंडे, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, रमेश भूते, विनोद शेरकी, माजी नगरसेवकद्वय श्याम कनकम, राजेंद्र अडपेवार, राजेंद्र खांडेकर, सचिन साधनकर, प्रशांत करजभाजने, राकेश चहारे, विपुल चहारे व अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.

आपल्या उद्घाटनपर भाषणात हंसराज अहीर यांनी दोन्ही मंडळांच्या क्रीडाविषयक योगदानाबद्दल




गौरवोद्गार काढत सतशील व सन्मित्र मंडळाद्वारे सर्वच क्रीडा प्रकारातील युवा खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून त्यांना जिल्हास्तरापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत कामगीरी पार पाडण्यास संधी दिली. कबड्डी खेळास नेहमीच प्रोत्साहन राहिले आहे. विदर्भस्तरीय व अन्य खेळांचे सामने आयोजित करुन खेळाडूंना त्या-त्या खेळात प्रदर्शन करण्यास वाव दिला आहे. पठाणपूरा, विठ्ठल मंदीर वार्ड, जोडदेऊळ, हिवरपूरी हे वार्ड प्रतिभावान खेळाडूंची खाण आहे. येथील रसीक खेळाडू प्रिय आहेत. त्यामुळे या परिसराचे विशेष आकर्षण असल्याचे अहीर म्हणाले. या मंडळाद्वारा अनेक क्रीडा प्रकारातील खेळाडूंना नावलौकीक मिळवून देण्यास या मंडळांचे अभुतपूर्व योगदान असल्याचेही त्यांनी सांगीतले.या कबड्डी स्पर्धेत सहभागी सर्व मंडळांच्या खेळाडूंचे स्वागत करून हंसराज अहीर यांनी त्यांना विजयाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मंडळाच्या वतिने हंसराज अहीर यांचे व मान्यवर अतिथींचे स्वागत करण्यात आले.या उद्घाटन सोहळ्यास मंडळाचे पदाधिकारी सर्वश्री.रवींद्र शेरकी, अमित लडके, महेंद्र व्याहाडकर, प्रमोद डाखोरे, किशोर कुडे, नितीन कुमरवार, मनोज शेरकी, गणेश काळे, समीर चापले, सचिन चापले, राम लांडगे, महेंद्र शेरकी, दीपक लडके, संकेत वांढरे, घनशाम डंभारे, मोहन चैधरी, मेघनाथ चैधरी, अभिजित चैधरी, शाम चापले, रोहीत लडके, मंगेश वाघाडे, ओम लडके, सौरभ शेरकी यांची उपस्थिती लाभली होती. या समारंभास बहूसंख्येने महिला, पूरूष युवक व क्रीडा क्षेत्रातील खेळाडू उपस्थित होते.

## दबा धरून बसलेल्या बिबट्याचा तरुणावर हल्ला

**मूल । प्रतिनिधी**

तालुक्यातील मारेगाव येथे आशिष राजू दुधकोवार (वय १७) या तरुणावर बिबट्याने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना मुलपासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या नागपूर रस्त्यावरील मारेगावजवळील शेतात घडली.



मिळालेल्या माहितीनुसार,आशिष एमआयडीसी परिसरातील पृथ्वी कंपनीजवळील विश्वेश्वर कोंडू पेंदोर यांच्या शेतात शेळ्या चरत होता. दुर्दैवाने तो झुडपात गेला असता, तिथे दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्याच्यावर अचानक हल्ला केला. हल्ला झाल्यावर आशिषने जोरात आरडाओरडा केला मात्र बिबट्याने तरुणाला गंभीर दुखापत करून बिबट्याने घटनास्थळ सोडले.आशिषला तातडीने मूल येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.वनपरिक्षेत्र अधिकारी वैभव राजूरकर, वनपरिक्षेत्र अधिकारी धनविजय यांच्यासह वनविभाग घटनास्थळी पंचनामा करत आहेत.तरूणाच्या कुटुंबाने वन परिक्षेत्र अधिकारी,वनविभाग,सावली यांच्याकडे आर्थिक मदतीची विनंतीही केली आहे.बिबट्याचे हल्ले दुर्मिळ आहेत परंतु ते अत्यंत धोकादायक असू शकतात,विशेषत: जंगलाच्या परिसरात राहणाऱ्यांसाठी.अशा प्रदेशांतील रहिवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी अधिकाऱ्यांनी योग्य उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे. ही घटना वन्यजीव संरक्षणाची गरज आणि मानव आणि प्राणी यांच्यातील सहअस्तित्वाच्या महत्त्वाची आठवण करून देणारी आहे.

# अंतरवली आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या मदतीला पुन्हा एकदा धावले मुख्यमंत्री शिंदे

**अंबड** -अंतरवाली सराटी येथे १४ ऑक्टोबर रोजी झालेल्या मनोज जरांगे-पाटील यांच्या सभेवेळी लाखोंची गर्दी जमली होती. यावेळी अनेक शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं होतं. अशा ४४१ बाधित शेतकऱ्यांना यापूर्वी पहिल्या टप्प्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ३२ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. तर, आता दुसऱ्या टप्प्यात उर्वरित राहिलेल्या १३० शेतकरी बांधवाना १४ लक्ष ५५ हजार रुपयांची नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे. मराठा आरक्षण आंदोलन निर्णायक स्थितीत पोहोचले आहे. राज्य सरकारच्या वतीने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांनी आज सकाळी राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल स्विकारला आहे. सरकारकडून

येत्या २० फेब्रुवारी रोजी मराठा आरक्षण प्रश्नावर विधिमंडळाचे विशेष अधिवेशन घेण्याची घोषणा केल्याने मराठा समाजाकडून समाधान व्यक्त केले जात असतानाच जालन्यातील विशेषतः अंतरवली सराटी आणि आसपासच्या गावांतील शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. एखाद्या आपत्तीत झालेल्या नुकसानीनंतर शासनाकडून नुकसान भरपाई देण्यात येते. एखाद्या सभेमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याचा प्रघात नाही. मात्र मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून मराठा आरक्षणाचा उभारण्यात आलेला प्रामाणिक लढा आणि त्यात समाजबांधवांनी घेतलेला उत्स्फुर्त सहभाग लक्षात घेत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला. यामुळे शेत जमीनीचे सभास्थान म्हणून वापरल्याने झालेल्या नुकसानासाठी संबंधित ४४१ शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यात तर १३० शेतकऱ्यांना दुसऱ्या टप्प्यात नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. एकूण ५७१ शेतकऱ्यांना ४६ लक्ष रुपयांची नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या या निर्णयाचे शेतकरी बांधवांकडून स्वागत करण्यात येत आहे. दरम्यान, मराठा आरक्षण आंदोलनावेळी झालेल्या लाठीचार्जमध्ये जखमी झालेल्या आंदोलकांवरील उपचारासाठीही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून २५ लाखांहून अधिक रुपयांच अर्थसहाय्य केले होते.

या कामी मंगेश नरसिंह चिवटे, कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष तथा विशेष कार्य अधिकारी , मुख्यमंत्री सचिवालय यांनीही विशेष मेहनत घेतली म्हणून परिसरात त्यांचेही विशेष आभार मानले जात आहेत. तर, गेली ६ महिन्यात या आंदोलना दरम्यान बलिदान दिलेल्या ( आत्महत्या ) एकूण ८० मराठा समाज बांधवांच्या परिवारास प्रत्येकी १० लक्ष अशी एकूण ८ कोटी रुपये मदत वितरीत करण्यात आलेली आहे.तसेच, मृत कुटुंबातील प्रत्येकी एका सदस्यास महाराष्ट्र राज्य एस टी महामंडळात शैक्षणिक अर्हतेनुसार नोकरी देण्याचा प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा सुरू आहे.



## मराठा आरक्षणासाठी मरवडेत दुसऱ्या दिवशी रस्ता रोको;आठवडा बाजार बंद



**मंगळवेढा :** मराठा आरक्षणासंदर्भात जोपर्यंत अधिवेशन घेऊन कायदा मंजूर होत नाही व मराठा बांधवावरील गुन्हे मागे घेतलेले जात नाहीत तोपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याची भूमिका घेतलेल्या आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची ८ व्या दिवशी प्रकृती खालावल्यामुळे मराठा बांधवांच्या भावना तीव्र झाल्याने मरवडे येथील सकल मराठा बांधवानी रस्ता रोको आंदोलन केल्यामुळे पंढरपूर -विजयपूर या महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली तर दर शनिवारी भरणारा आठवडा बाजार आज बंद ठेवण्यात आला आहे.सकल मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून झालेल्या आंदोलनात मंगळवेढ्यातील सकल मराठा बांधव आग्रही राहिली. सध्या मनोज जरांगे पाटील यांचे आंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू आहे मात्र यावर अद्याप तोडगा न निघाल्यामुळे सरकार बद्दल समाजाच्या बांधवांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त सुरू झाले आहे काल मरवडे येथील मराठा बांधवांनी भगव्या टोप्यावर, झेंडे परिधान करून एक मराठा लाख मराठा अशा घोषणा आंदोलकांनी भर रस्त्यावर ठिय्या मांडला पंढरपूर विजयपूर मार्गावरील वाहतूक बंद ठेवण्यात आली.त्यावर अद्याप तोडगा न निघाल्याने आज सलग दुसऱ्या दिवशी देखील ही वाहतूक व्यवस्था बंद ठेवण्यात आली. शनिवारी भरणारा आठवडा बाजार बंद ठेवण्यात आल्याने येथील आठवडा बाजारावर अवलंबून असलेल्या तळसंगी येड्राव खवे जित्ती डोणज नंदुर बालाजी नगर कागष्ट कात्राळ भालेवाडी कर्जाळ डिकसळ फटेवाडी या भागातील शेतकरी विक्रेते व खरेदीदाराची गैरसाय झाली असली तरी आंदोलकांची सरकार विरोधी भावना तीव्र झाली ग्रामीण भागात यापूर्वी भाळवणी, भोसे ही गावे बंद ठेवून जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा दिला.तहसीलदार मदन जाधव व पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी घटनास्थळी भेट देऊन आंदोलन आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला सरकार दोन दिवसात यावर मार्ग काढेल अशी समजूत घातल्यानंतर आंदोलकांनी आणखीन दोन दिवस बंद राहिल्यानंतर काय होईल असा प्रतिसाद उपस्थित केला

## पी.व्ही.पी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,पाटोदा संघ विजयी

**पाटोदा | प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाने क्रिकेट सामन्यांचे बीड विभागातील फार्मसी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजन केले होते. या एक दिवसीय सामन्यात प्राथमिक चाचणीनंतर परिसरातील महाविद्यालयांची स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. त्यामध्ये नवगण शिक्षण संस्था संचालित पी. व्ही. पी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, पाटोदा संघाची निवड झाली.

या स्पर्धेचे आयोजक प्राचार्य श्री. सुरेंद्र कुटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत सर्व उपस्थित पाहुण्याचे आणि संघांचे स्वागत केले. क्रिकेट सामन्यांचे उदघाटन पी. व्ही. पी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालायचे प्राचार्य श्री. तांदळे संदीप यांच्या हस्ते करण्यात आले व त्यांनी सर्व संघाना शुभेच्छा देऊन त्यांचा उत्साह द्विगुणित केला. संघाना संबोधताना त्यांनी उपस्थित सर्व विद्यार्थी व क्रिकेट सामने खेळण्यास प्रोत्साहन दिले.उदघाटन प्रसंगी उपस्थित प्राचार्य श्री.सुरेंद्र कुटे यांनी सुद्धा सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यांनी आरोग्यदायी जीवनासाठी खेळाचे महत्व पटवून सांगितले तसेच खेळ खेळल्याने आपले शारीरिक व मानसिक आरोग्य कसे उत्तम राहू



शकते याची काही उदाहरणे दिली. या सामन्यामध्ये पी. व्ही. पी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालाय, पाटोदा संघाने विजय प्राप्त केला. याप्रसंगी प्रथम व द्वितीय वर्षीय विद्यार्थ्यांनी विजयी जल्लोष साजरा केला, यावेळी उपस्थित संघाचे मार्गदर्शक प्रा. तारेक टी. क्यू, प्रा. पठाण ए.के, प्रा. घुमारे व्ही.एस, प्रा. बहिर एस. एम, प्रा. क्षीरसागर के.आर, प्रा. तहा बासाद व इतर कर्मचारी वृंद

## नरवाडी येथे सकल मराठा बांधवांचे रास्ता रोको आंदोलन



**सोनपेठ | प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी पुन्हा उपोषण कर्ते मनोज जरांगे पाटील आंतरवाली येथे आंदोलनाला बसले होते त्यांच्या आमरण उपोषणाला सहावा दिवस लोटल्यानंतर त्यांची प्रकृती खराब होत चालल्याने मराठा बांधवां मध्ये चिंतेचे वातावरण तयार झाल्यामुळे त्यांच्या समर्थकांनी नरवाडी येथील बस स्टॅन्ड नरवाडी गंगाखेड मार्गावर रास्ता रोको आंदोलन केले तसेच रस्त्याची वाहतूक अडविण्यासाठी आंदोलक समाजाने प्रयत्न केला, जागोजागी झाडांची झुडपे बोराट्या, दगड लावून रस्ता अडविण्यात आला तसेच आंदोलन स्थळी टायर जाळुन केंद्र व राज्य सरकार निषेध व्यक्त करण्यात आला.यावेळी असंख्य मराठा बांधवांचा रास्ता रोको आंदोलनात सहभाग होता.

## वैद्यकीय प्रतिनिधींचा संपात शंभर टक्के सहभाग

**परभणी | प्रतिनिधी**

केंद्रीय कामगार संघटनेद्वारा पुकारलेल्या देशव्यापी संपात महाराष्ट्र राज्य वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेच्या परभणी जिल्हा शाखेच्या पदाधिकार्यांसह सर्व सदस्यांनी शंभर टक्के सहभाग नोंदवला.

३१० प्रतिनिधींनी या देशव्यापी संपात सहभाग नोंदवून शुक्रवारी (दि.१६) आपल्या प्रलंबित मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली. त्या पाठोपाठ निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांची भेट घेवून आपल्या प्रलंबित मागण्यांसदर्भातील तपशीलवार असे निवेदन सादर केले. त्याद्वारे, सेल्स टारगेटच्या नावाखाली वैद्यकीय ही छळवणूक केली जाते ती बंद करावी,



वैद्यकीय प्रतिनिधींच्या सर्वसाधारण कामकाजाचे संवैधानिक नियम तयार करावे, केंद्र शासनाने वैद्यकीय प्रतिनिधींना शासकीय रुग्णालयांमध्ये प्रवेश बंदी केली आहे ती तात्काळ उठवावी, जे चार श्रम संहिता कायदा तात्काळ रद्द करावा, मुख्यत्वे गोपनीयता व खाजगी पणाची जपणूक करावे, जीपीएसच्या नावाखाली पाळत ठेवण्याचा जो आदेश औषधी कंपनी लादत आहेत तो तात्काळ थांबवावावेत, आदी मागण्या करण्यात आल्या.दरम्यान, यावेळी वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेचे जिल्हा सचिव विशाल भारस्वाडकर, अनिल पांडे, कॉ. रामराजे महाडिक, कॉ. जफर उला पठाण आदींनी मार्गदर्शन केले. या आंदोलनात कॉ. गिरीश जोशी, कॉ. बंडू जोशी, कॉ. सचिन बेटकर, कॉ. स्वानंद देशमुख, ज्ञानेश्वर कवडे, दत्ता कदम, कॉ. गिरीश कस्तुरे यांच्यासह अन्य पदाधिकारी सहभागी होते.

# शेतकरी-कामगारांचा जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चा केंद्र सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाचा नोंदवला निषेध

**परभणी | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाविरूध्द संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने शुक्रवारी (दि.१६) ग्रामीण भारत बंद आणि सत्याग्रहाचे आयोजन केले होते. या बंदला कामगार संघटनानी समर्थन देत परभणीत जिल्हाधिकारी कचेरीवर जोरदार मोर्चा काढला. कॉ. राजन क्षीरसागर व कॉ. माधुरी क्षीरसागर यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या या मोर्चात संयुक्त किसान मोर्चा, महाराष्ट्र राज्य किसान सभा, स्वराज इंडिया, किसान सेना, किसान सेल कॉंग्रेस, आयटक प्रणीत कामगार संघटना, समृद्धी बाधित शेतकरी संघर्ष समिती, लालबावटा वाहन चालक मालक संघटनांनी मोठा सहभाग नोंदवला. प्रत्येक तालुक्यात विविध मागण्यांसाठी बंद आणि संप पुकारून मोर्चा आणि रास्ता रोको इत्यादी मार्गाने सत्याग्रह करून सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध केला.

शेतमालाला स्वामिनाथन शिफारशीनुसार हमी भावाचा हक्क देणारा कायदा करा, कापसाला १२ हजार आणि सोयाबीनला ८ हजार रुपये प्रति क्विंटल भाव द्या, कांदा निर्यातबंदी रद्द करा, परभणी जिल्ह्यात प्रत्येक जिंनिगमध्ये सीसीआय व नाफेड



मार्फत कापूस खरेदी सुरु करावी, दुष्काळग्रस्त शेतकर्यांना कर्जमाफी द्यावी, दुष्काळी उपाययोजना सुरु कराव्यात, दुष्काळग्रस्त शेतकरी व शेतमजुरांना एनडीआरएफ/एसडीआरएफ मदत लागु करावी, गावांना पिण्याचे पाणी, चारा डेपो इत्यादी आवश्यक सुविधा द्याव्यात, खरीप २१ मधील थकीत ४७६ कोटी रुपयांच्या पीकविमा भरपाईसह खरीप २२ व खरीप २३ हंगामातील संपूर्ण पीक विमा भरपाई द्या आणि पीक विमा योजनेची पुनर्रचना करावी, सोनपेठ तालुक्यातील थकीत विमा द्यावा, वीजखात्याने सुरु केलेली प्रीपेडमीटर योजना रद्द करावी, शेतीपंपासाठी मोफत व १८ तास वीज द्यावी, किसान मानधन बंद करा व शेतकरी आणि शेतमजुरांना हक्काची पेन्शन योजना लागू करावी, जायकवाडीसह सर्व जलाशयावर प्रस्तावित सौर प्रकल्प रद्द करावा, जायकवाडी कालवे दुरुस्त करावेत, शेतकरी पाणी हक्काचे कायदे अमलात आणावे, जायकवाडी व सिद्धेश्वर प्रकल्पातून रब्बी व उन्हाळी पिकांना पाणी पाळ्या द्याव्यात, सर्व गोदावरी बंधार्यात मुबलक पाणीसाठा द्यावा, सर्व महानगरात सांडपाणी पुनर्वापर करण्याचा कायदा करावा, भूसंपादन कायदा २०१३ मूळ रुपात अंमलबजावणी करा. समृद्धी बाधित शेतकर्यांना व्यावसायिक दराने मोबदला द्या शेतकर्यांवरील दंडेलशाही करून जमीन बळकावण्यास प्रतिबंध करावा, ३८ कामगार कायदे रद्द करणारे धोरण रद्द करा, औद्योगिक कामगारांना किमान वेतन द्या, पेन्शन द्या, कंत्राटीकरण, खाजगीकरण तत्काळ रद्द करा. नोकर भरती घोटाळा प्रकरणी गुन्हे दाखल करावे, सर्व नोकर भरती प्रक्रिया एमपीएससीमार्फत करावे व शाळा व दवाखान्यांचे खाजगीकरण बंद करावे आदी मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

# आदिवासींच्या मदतीनेच नक्षलवाद संपविणार

## नक्षलवादाविरूद्धच्या शेवटच्या लढाईसाठी सज्ज राहा-डीजीपी रश्मी शुक्ला

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी शासन कटिबध्द आहे. जनतेने माओवाद्यांच्या भूलथापांना बळी पडू नये, येत्या काळात पेथील आदिवासी बांधवांच्या मदतीनेच आम्ही नक्षलवाद संपवू, असा विश्वास व्यक्त करत गडचिरोली पोलीस दलाच्या सी-६० पथकाचा मला अभिमान आहे. सी-६० पथकातील जवानांनी आता नक्षलवादाविरुद्धच्या शेवटच्या लढाईवर लक्ष केंद्रीत करावे, अशी सूचना राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी केले. डीजीपी म्हणून पदभार घेतल्यानंतर पहिल्यांदाच त्या शनिवारी गडचिरोलीत आल्या होत्या. यावेळी त्यांनी अतिसंवेदनशिल भागातील पोलिस मदत केंद्रांना भेटी देऊन सी-६० पथकाच्या जवानांना मार्गदर्शन केले.

नव्याने सुरू करण्यात आलेल्या गर्दवाडा पोलिस मदत केंद्राच्या परिसरात महाजनजागरण मेळाव्यात रश्मी शुक्ला यांनी मार्गदर्शन केले. वांगेतुरी पोलिस मदत केंद्राच्या कामकाजाची पाहणी करून उपस्थित अधिकारी व अंमलदारांशी संवाद साधला. तसेच सुरजागड येथील पोलिस अंमलदार निवासस्थान आणि भोजन कक्षाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. प्राणहिता (अहेरी) येथील उपमुख्यालयात सी-६० जवानांचे मनोबल उंचावत त्यांनी जवानांशी संवाद साधला. याशिवाय किटाळी येथील कमांडो ट्रेनिंग सेंटरलाही त्यांनी भेट दिली.

यावेळी प्रशिक्षणार्थी बेरेक, टॅक्टीकल फायरिंग रेंज, कंट्रोल रुम व फायरबट क्र.। च्या नुतनीकरणाचे उद्घाटन शुक्ला यांच्या हस्ते पार पडले.यावेळी राज्य गुप्तवार्ता विभागाचे आयुक्त शिरीष जैन, विशेष पोलिस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) संदीप पाटील, पोलिस उपमहानिरीक्षक अकित गोयल, पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलिस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख, अपर पोलिस अधीक्षक (अहेरी) एम.रमेश हे प्रामुख्याने उपस्थित होते.

नागरिक, विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप

महाजनजागरण मेळाव्यात उपस्थित नागरिकांना आयुष्यमान भारत कार्ड, आभा कार्ड, ई-श्रम कार्ड व इतर शासकिय कागदपत्रे, स्प्रे पंप, स्वयंपाकासाठी लागणारी मोठी भांडी, मच्छरदानी, ब्लॅकेट, लोवर टी शर्ट, मोठे बल्ब, महिलांना साड्या व चप्पल, तसेच शालेय विद्यार्थ्यांना सायकल, पेन, नोटबुक, क्रिकेट किट, व्हॉलीबॉल व नेट, कपडे, कंपॉस, चॉकलेट, बिस्कीट इ. साहित्यांचे वाटप करण्यात आले.यावेळी गर्देवाडा येथे जनजागरण मेळाव्याला उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना पोलिस महासंचालक शुक्ला म्हणाल्या, शिक्षणाच्या जोरावर आदिवासी समाजातील महिला देशाच्या राष्ट्रपतीपदी येऊ शकतात. आजपर्यंत माओवाद्यांच्या प्रभावामुळे हा परिसर विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिला होता. परंतू आता नवीन पोलिस मदत केंद्रांच्या स्थापनेमुळे येथील नागरिक भयमुक्त होऊन विकासाच्या प्रवाहात येतील. पोलिस दादालोरा खिडकीसारख्या उपक्रमातून दुर्गम भागातील आदिवासी बांधवांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळत असल्याचे त्या म्हणाल्या.किटाळी येथे पोलिस महासंचालकांनी बिडीडीएस (बॉम्ब शोधक व नाशक पथक), माओवादविरोधी अभियानामध्ये गडचिरोली पोलिस दलाकडून वापरलेली शस्त्रास्त्रे, ड्रोन व विविध प्रकारच्या पुद्धनितीबाबत प्रात्यक्षिकाद्वारे माहिती घेतली.



## शिवजन्मोत्सव निमित्य चांदापूर येथे रक्तदान शिबीर



**मुल । प्रतिनिधी**

शिवगर्जना सांस्कृतिक,कला,क्रीडा,बहुउद्देशीय संस्था चांदापूरच्या सौजन्याने दिनांक १७ फेब्रूवारी रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चांदापूर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला सरपंच सोनी देशमुख सरपंच माजी सरपंच खुशालराव शेरकी माजी उपसरपंच , दिलीप पाल यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्तदान शिबिराची सुरुवात करण्यात आली होती यावेळी पंकज निशाने, देविदास देशमुख,पुनित चिंचोलकार, हेमंत शेरकी,अनिकेत फलके,वसंत पोटे, दिवाकर केळझरकर, नंदकिशोर शेरकी,राकेश मिडपल्लीवार,किशोर कडूकार, दिपक आगरे, किशन कोरडे, आशिष पाल,ठकसेन मिसार,गौरव कन्नाके, दुर्योधन कोहपरे,भुपती चिंचेकार, नितेश चिंचोलकार,दिलीप पाल, मनोज शेरकी,सुरेश देशमुख, अभिजित चिंचोलकर,राकेश फाले, धिरज पाल,कमलेश चुदरी,दिलीप पोटे व इतर रक्तदात्यांनी रक्तदान केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंकुश शेरकी,नवनित चिंचोलकर, दिनकर झरकर,रुपेश अल्लीवार, धनराज निशाने,राहुल निशाने यांनी अथक परिश्रम घेतले.

## जि.प.प्रा.शा.बनकरवाडी शाळेची गायत्री मॉलला भेट



**सांगोला । प्रतिनिधी**

दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी जि. प .प्रा .शा. बनगरवाडी शाळे च्या विद्यार्थ्यांची गायत्री मॉल सांगोला येथे क्षेत्रभेट झाली. सदर क्षेत्र भेटीमध्ये विद्यार्थ्यांना मॉल ही संकल्पना स्पष्ट झाली. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना अक्रोडासहित सर्व ड्रायफ्रूट्स प्रत्यक्ष पाहायला मिळाले .मसाल्याच्या पदार्थातील चक्रीफुल, दौंड फुल ,मसाला वेलदोडा अशी बरीच नावे व पदार्थ पाहायला मिळाले. सैंधव मीठ विद्यार्थ्यांनी आवर्जून पाहिले .आरोग्यदायी मखाना विद्यार्थ्यांनी पाहिला .सर्व प्रकारचे कडधान्य ,डाळी यांचे वर्गीकरण विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात समजून घेता आले. मॉलमध्ये विविध वस्तू त्यांचे पॅकिंग यांचे नीट निरीक्षण विद्यार्थ्यांनी केले .बारकोड नंबर पाहिला .आज विद्यार्थ्यांनी मॉल पहिल्याचा एक वेगळा आनंद त्यांना मिळाला. तेथील सर्वच स्टाफ ने अतिशय उत्कृष्ट सहकार्य केले .बारकोडद्वारे केले जाणारे बिलिंग आणि यूपीआय द्वारे होणारे आर्थिक व्यवहार विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष समजून घेतले. मॉल भेट दिल्याबद्दल विद्यार्थ्यांना त्याच्याकडून खाऊ मिळाला. करण्यात आले. मॉल पाहण्याची संधी दिल्याबद्दल शाळेच्या वतीने मॉल मालकांचा सत्कार करण्यात आला .याचे नियोजन शाळेतील शिक्षिका डॉक्टर राजेश्वरी कोरे, अंजली बिराजदार व सविता फुले यांनी केले.

## मुल येथे होणार लावण्यांचा महासंग्राम

**मूल :** राज्याचे सांस्कृतिक मंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रेरनेतुन मुल येथे होत असलेल्या सांस्कृतिक महोत्सवात दि.२० फेब्रुवारीला दुपारी २ वाजता झाडीपट्टीच्या सुप्रसिद्ध नृत्यांगनांच्या मराठमोळ्या लावण्यांची जुगलबंदी पहायला मिळनार आहे..यात सुप्रसिद्ध लावणीसम्राज्ञी किर्ती मरस्कोल्हे, लावणीसम्राज्ञी संजीवनी गेडाम, लावणीसम्राज्ञी रुपाली राऊत, लावणीसम्राज्ञी स्नेहा गेडाम, लावणीसम्राज्ञी ज्योती रामावार, लावणीसम्राज्ञी मयुरी दिघोरे, लावणीसम्राज्ञी दिपाली भरडे या झाडीपट्टीच्या तारकांच्या लावण्यांची जुगलबंदी आपल्याला पहायला मिळनार आहे.तरी याचा लाभ घ्यावा असे आयोजन समीतीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

## सेलू शहरात मराठा समाजाचे जेल भरो आंदोलन



### संपूर्ण तालुक्यातील समाज बांधवांनी जोरदार समर्थन देत जेल भरती मध्ये सहभाग

**सेलू । प्रतिनिधी**

दि.१६ मराठा समाजाच्या आरक्षणा च्या प्रश्नावर विशेष अधिवेशन बोलवावे, या मागणीसाठी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी सुरु केलेल्या बेमुदत उपोषणास पाठींबा म्हणून सेलू सकल मराठा समाजाच्या वतीने शुक्रवार १६ फेब्रुवारी रोजी जेल भरो आंदोलन करण्यात आले. सेलू तालूका जेल भरो आवाहनास जोरदार प्रतिसाद मिळाला. शहरासह तालुक्यातील सर्व खेड्यातील समाज बांधवांनी स्वतः हजर राहून जेल मध्ये भरती झाले . सेलू शहरात या जेल भरो आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाजाने या आंदोलनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले होते. त्यामुळेच सर्व खेड्या पाड्यातील समाज बंधू आणि भगिनी उपस्थित राहून या आवाहनास प्रतिसाद देतील हे अपेक्षितच होते. त्याप्रमाणे शुक्रवार रोजी सकाळपासूनच रायगड कॉर्नर येथे एकत्र जमवून सेलू पोलीस ठाणे येथे सकल मराठा समाजाच्या एकत्र येऊन जेल मध्ये स्वतः भरती करून पोलीस ठाणे दणाणून सोडले. एक मराठा कोटी मराठा म्हणत जरांगे पाटलाच्या आमरण उपोषणाला पाठींबा दिला आहे. एक मराठा लाख मराठा, आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कोणाच्या बापाचं या घोषणांनी संपूर्ण पोलीस ठाणे दणाणून निघाले. तालुक्यातील सर्व ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत शेकडो संख्येने उपस्थित राहून जेल मध्ये जाण्यास संमती देऊन भरती झाले. दिला. दरम्यान, जिल्हा पोलिस यंत्रणेने या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सर्वदूर मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त तैनात केला होता.दरम्यान पोलिस निरीक्षक प्रभाकरराव कवाळे, उप विभागीय पोलीस अधिकारी सुनील ओव्हाळ स्थितीवर नियंत्रण ठेवून होते दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

## पतसंस्थेच्या कॅशियरला पिस्तुलाचा धाक दाखवून ३९ लाखांची रक्कम लुटली

### अंबाजोगाईत भरवस्तीत रोडरॉबरी



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दिवसभराचे कामकाज आटोपून पतसंस्थेत जमा झालेली रक्कम सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी निघालेल्या कॅशियरला तीन चोरट्यांनी रस्त्यात अडवून पिस्तूल आणि चाकूचा धाक दाखवून त्याच्या जवळील जवळपास ३९ लाख रुपयांची रक्कम लुटल्याची घटना अंबाजोगाईत शुक्रवारी (दि.१६) रात्री घडली.

सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, अंबाजोगाई शहरातील प्रख्यात असलेल्या राजर्षी शाहू पतसंस्थेचे कॅशियर गणेश देशमुख हे शुक्रवारी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास दैनंदिन कामकाज आटोपून दिवसभरात जमा झालेली जवळपास ३९ लाख रुपयांची रक्कम सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी सेवकासोबत दुचाकीवरून निघाले होते. ते मुकुंदराज कॉलनीत आले असता त्यांच्या पाळतीवर असलेल्या तिघा चोरटयांनी त्यांना अडविले. स्वतः जवळील पिस्तूल काढून त्यांनी ती देशमुख यांच्या डोक्याला लावली. पिस्तूल आणि त्यासोबत चाकूचा धाक दाखवून त्यांनी देशमुख यांच्याकडील ३९ लाख रुपये रक्कम ठेवलेली बॅग घेतली आणि पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, भर वस्तीत घडलेल्या या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

## सकल मराठा समाजाच्या वतीने रस्ता रोको आंदोलनाचे आयोजन



### बोरी येथील महावितरण कार्यालयासमोर होणार रस्ता रोको

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील बोरी व परिसरातील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने मराठा आरक्षणाबाबत जिंतूर परभणी महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यासाठी दिनांक १६ फेब्रुवारी शुक्रवार रोजी जिंतूर तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. दिनांक १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:०० वाजता जिंतूर परभणी महामार्गावरील बोरी येथील महावितरण कार्यालयासमोर रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

मराठा आरक्षण हे अंतिम टप्प्यात आले आहे सगेसोयरे या बद्दल सरकारने कोणतेही ठोस पाऊल उचलले नसल्यामुळे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मागील सात दिवसापासून बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे राज्य सरकारने त्यांच्या आंदोलनाकडे पूर्णत्व दुर्लक्ष केले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी तसेच राज्य सरकारला वटणीवर आणण्यासाठी बोरी, कुपटा, कौसडी, वस्सा सर्कल मधील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने रस्ता रोको करण्याचे आयोजित केले आहे हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी परिसरातील मराठा समाज बांधवांनी आपल्या माता भगिनीं मुलं बाळांसह बैलगाड्या चार चाकी वाहने दुचाकी वाहने घेऊन आंदोलनात स्थळी उपस्थित राहावे असे आव्हान सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे.

## दील्लीतील शेतकऱ्यांच्या आंदोलनात देशातील सर्व शेतकऱ्यांनी एकवटले पाहिजे-भूमिपुत्र ब्रिगेड

**मुल । प्रतिनिधी**

दिल्लीमध्ये शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी भूमिपुत्र ब्रिगेडच्या वतीने तहसीलदार यांना डॉ राकेश गावतुरे यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले.आपला देश भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि कृषी हा येथील अर्थव्यवस्थेचा एक प्रमुख पाया आहे.येथील जनतेला महत्त्वाची गरज म्हणजे अन्नधान्य निर्माण करण्याचे काम शेतकरी करत असतो.आम्ही अभिमानाने म्हणतो की शेतकरी या देशाचा राजा आहे पण वास्तविक शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंदिवस अतिशय हलाकीची होत चालली आहे.या भारतातील प्रत्येक उत्पादकाला त्याने उत्पादन केलेल्या मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार आहे ज्यातून तो नफा कमवीत असतो पण शेतकरी या गोष्टीसाठी अपवाद आहे.

शेतकऱ्याला त्याच्या शेतमालाचा भाव ठरविण्याचा अधिकार नाही आहे.म्हणूनच त्याच्या शेतमालाला कमीत कमी किमान समर्थन मूल्य एम.एस.पी.देण्याची अत्यंत निकटीची गरज आहे किंबहुना तो शेतकऱ्याचा हक्कच आहे. शेतकऱ्याला त्याच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा आणि शेतीची आणि शेतकऱ्यांची प्रगती व्हावी या उद्देशाने स्वाभिनाथन आयोग काढला गेला पण त्या स्वामीनाथन आयोगाच्या एकही शिफारशी आतापर्यंत गेल्या अनेक वर्षापासून या सरकारने लागू केल्या नाहीत. आतापर्यंत शेतकऱ्याला त्याची हक्क तर दिलेच नाही याउलट गेल्या दहा वर्षापासून शेतकऱ्याला व शेतीला बरबाद करण्याचा कार्यक्रम चालू आहे. नुकताच दोन वर्षांपूर्वी शेतीविरोधी तीन काळे कायदे केंद्र सरकारने लागू केले होते पण पंजाब,हरियाणा या भागातील शेतकऱ्यांनी जीवाची बाजी लावून, अनेक दिवस संघर्ष करून ते शेतकरी विषयक काळे कायदे मागे घेण्यासाठी सरकारला भाग पाडले. यावेळेस पुन्हा शेतकऱ्याला किमान समर्थ मूल्य मिळावे या मागणीसाठी दिल्ली येथील रस्त्यावर आसपासच्या प्रदेशातील शेतकऱ्यांनी आंदोलन चालू केले.मागणी काय तर फक्त आमच्या शेतकऱ्याला योग्य तो हमीभाव देण्यात यावा पण केंद्र सरकार सातत्याने शेतकऱ्याची पिळव नुक करत आहे.दिल्ली येथील जंतर मंतर या मैदानावर शेतकऱ्यांना एकत्रित येऊ द्यायचे नाही या यासाठी रस्त्यामध्ये खिळे ठोकले आहेत.संविधानिक दृष्ट्या चालू असलेल्या या आंदोलनावर केंद्र सरकार द्वारा विविध पोलीस व निमलष्करी र दलाचा वापर करून त्यांच्यावर अश्रुदार गोडे फेकून या शेतकऱ्यांना पांगवण्याचा व शेतकऱ्याची हक्काचे आंदोलन दाबण्याचा प्रयत्न चालू आहे.ज्या पद्धतीने शेतकऱ्यावर अमानवी अत्याचार चालू आहे जसे की शेतकरी म्हणजे आतंकवादीच आहे. शेतकऱ्याचा बजेट भांडवल दाराच्या घशात टाकून शेतकऱ्यांना बरबाद करण्याचा कार्यक्रम या विद्यमान केंद्र सरकारद्वारे या भारतात सुरू आहे. आणि कुठल्याही प्रकारच्या या भांडवलदर धार्जिणा या मीडिया द्वारे हे सामान्य जनतेपर्यंत दाखविल्या जात नाही आहे.त्यामुळे भारतातल्या सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित केलेल्या शेतमालाला किमान समर्थन मूल्य एम एस पी मिळावी आणि शेतकरी गुण्यागोविंदाने जगला पाहिजे या गोष्टीसाठी दिल्ली येथे सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या त्यांच्या हक्काच्या आंदोलनासाठी आम्ही भूमिपुत्र ब्रिगेड जिल्हा चंद्रपूर द्वारे जाहीर समर्थन करतो तसेच आपल्या भागातील सर्व शेतकऱ्यांना त्याच्या हक्क अधिकार मिळाले पाहिजे ,स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू झाल्या पाहिजे असे निवेदन दिले यावेळी प्रांताध्यक्ष डॉ समीर कदम, शहराध्यक्ष नितेश मॅकलवार , चांगदेव केमेकर सरपंच,विनोद निमगडे,राकेश मोहुर्ले सागर कांबळी,सचिन आंबेकर आकाश आरेवार, सागर आऊलवार,अतुल मडावी शुभम कावळे,शशांक लांडे व आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# मूल तालुक्यातील चितेगाव,बोरचांदणी,जुनसुर्ला,नवेगाव,बेंबाळ,गोवर्धन येथील जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये बुक वाटप

## जबाबदाऱ्या आणि स्वावलंबन विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी उपयुक्त : नाजुका आलाम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या बुध्दितमत्तेला योग्य दिशा द्यायची असेल तर त्याची सुरवात त्यांच्या लहानपणापासूनच करायला हवी. विद्यार्थ्यांवर पडलेल्या अशा छोट्या-छोट्या आर्थिक जबाबदाऱ्या आणि स्वावलंबन त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी उपयुक्त ठरतात अश्या सामाजिक कायकर्त्या नाजुका हनुमान आलाम यांनी म्हणाल्या.





महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, महाराष्ट्र संचालक तथा चंद्रपूरचे माजी सभापती काँग्रेस नेते दिनेशभाऊ चोखारे यांच्या मार्गदर्शनात सामाजिक कायकर्त्या नाजुका आलाम, काँगेसचे पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते करण कुंभरे, यांचे उपस्थित मूल तालुक्यातील चितेगाव, बोरचांदणी, जुनसुर्ला , नवेगाव, बेंबाळ, गोवर्धन येथील जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये बुक वाटप करण्यात आले.यावेळी चितेगाव येथे शाळा समितीचे अध्यक्ष गुणजी वाकुडकर, सदस्य अरुण मेश्राम, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक धर्मरन्त वाकडे, शिक्षक गोविंदा सोनटक्के, संजय गुरुनुले, शिक्षिका कल्पना वाकडे, वर्षा नरुले, बोरचांदणी येथे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापिका आशा जोगी, समितीचा अध्यक्ष संदीप कळसार, जिल्हेवार, माधुरी पोरेड्डीवार मॅडम , पेंदोर मॅडम, जुनसुर्ला येथे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बलराम वाळके, गावचे उपसरपंच राजेश गोवर्धन, समितीचे अध्यक्ष मनोज बेले, उपाध्यक्ष वर्ष मडावी, शिक्षक प्रेमदास सुरपाम, गणेश कुलसंगे, प्रतिभा नगराळे मॅडम, चित्रगत पुसतोडे, रेखा वारपल्लीवार, मंजुषा पारखी मॅडम, वृंदा पगडपल्लीवार, बेंबाळ येथे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद धामणे, शीक्षक राजेश सांगडे, विद्या निलगिलवार मॅडम , कल्पना मेश्रामी मॅडम, कालिदास कोसरे, गावातील प्रतिष्ठित अजय बासरकर, नवेगाव येथे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बंडू गेडाम, समितीचे सदस्य साईनाथ बुडे, शिक्षक कैलास वडक,. विजय बावणे, किरण मानकर, जगदीप दुधे, बालस्वामिओ कुमरे, उमाकांत दोडके, आकाश कुकुलकर, गोवर्धन येथे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बबन कन्नाके, समितीचे वर्षा कलाने यांचेसह तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि शाळेतील कर्मचारी उपस्थित होते.पुढे बोलतांना त्या म्हणाल्या कि, दिनेश चोखारे याचे हे कार्य अभिमानास्पद असून आज आपल्याला सामाजिक कार्यासह सर्व क्षेत्रात प्रगती करावीच लागेल. जोपर्यंत आपण ध्येय ठेऊन काम करत नाही, तोपर्यंत आपण काय करतो याला महत्त्व नाही. म्हणून समाजात वावरताना कोणता तरी उद्देश समोर ठेऊनच ध्येय प्राप्त करावे लागेलच. विद्यार्थ्यांनी सर्व क्षेत्रात भेदभाव न करता प्रगती केली पाहिजे. मुलांच्या बुध्दितमत्तेला योग्य दिशा द्यायची असेल तर त्याची सुरवात त्यांच्या लहानपणापासूनच करायला हवी. आपण त्यांच्यावर योग्य वयात संस्कार दिले तर त्यांना गोष्टींची जाणीव होईल. मुलांना योग्य वयात बचत आणि बचतीशी संबंधित गोष्टी शिकवा. बचत आणि खर्च यातला फरक त्यांना समजावून सांगा. देशातील वेगवेगळ्या बँकांनी लहान मुलांसाठी बँकेचे खाते उघडण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. ही एक नवी वाटचाल आपल्या मुलांना अगदी लहान वयापासूनच जागरूक करेल.बचत कशी करायची त्याचे फायदे काय हेही त्यांना सांगा असे सामाजिक कायकर्त्या नाजुका हनुमान आलाम यांनी सांगितले.वरील सर्व शाळांमध्ये सामाजिक कार्यकर्ता नाजूका आलाम, काँगेसचे पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते करण कुंभरे, यांनी शाळांना पुस्तके आणि शालेय साहित्याचे वाटप केले.

# विरूगिरी करत मतिमंद तरुण चढला रेल्वे टॉवरवर

**पुलगाव । प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यातील रिमोणा गावातील सचिन महादेव मेश्राम नावाचा तरुण पुलगाव रेल्वे स्थानकावर दि.१७ फेब्रुवारी सकाळी पुलगाव रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर हाय टेंशन लाईनच्या वरील टॉवरवर चढला होता. यामुळे स्थानकावर असलेले प्रवासी आणि नागरीक स्थानकावर जमा झाले. पुलगाव रेल्वे स्थानकाचे स्टेशन मास्तर कुलकर्णी हे देखील त्यांच्या चमूसह उपस्थित होते. तात्काळ पुलगाव शहराच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. सर्वांनी मिळून त्या तरुणाला खाली उतरण्याची विनंती करण्यास सुरुवात केली. परंतु त्यांनी कोणाचेही ऐकले नाही.तो कोणाचे ऐकून घेण्यास तयार नव्हता.अग्निशमन दलाची सिढी लावण्यात आली.त्यानंतर रेल्वे कर्मचारी खांबावर चढले व त्याला खाली आणण्याचा प्रयत्न केला.मात्र तो तरुण मागे हटत होता. भरपूर प्रयत्न आणि विनवणी केल्या नंतर शेवटी त्याचे पाय धरून खाली ओडले आणि खाली ब्लँकेट घेऊन कर्मचारी व नागरिक उभे होते.त्याला २ तासांच्या



अवधीनंतर खाली आणण्यात यश आले आणि रेल्वे प्रशासन सुखावले. रेल्वे व्यवस्थापक कुलकर्णी यांच्याशी फोनवर चर्चा केली असता, ते कसे चढले?हे नंतर कळले असे त्यांनी सांगितले.रेल्वे प्रशासनाच्या सुरक्षेसाठी तैनात असलेले अधिकारी व कर्मचारी त्यावेळी कुठे होते?हा मोठा प्रश्न आहे. रात्रीच्या अंधारात जर विद्युत खांबावर चढला असता आणि कोणाच्या लक्षात आले नसते तर मोठा अनर्थ घडू शकला असता.सदर तरुणाला खाली आणल्यावर रेल्वे आर. पी. एफ. ने आपल्या कोठडीत ठेवले. चौकशी केल्यावर तो यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगांव तालुक्यातील रिमोणा गावचा सचिन महादेव मेश्राम असून त्याचे शिक्षण १२ वी पर्यंत झाले आहे. त्याचे वय २८ आहे. सदर घटनेमुळे सर्व गाड्यांना कवठा रेल्वे स्थानकावर थांबविण्यात आले. या घटनेमुळे गाड्या १ तास विलंबाने धावायला लागल्या. यावेळी रेल्वे पोलीस सहनिरीक्षक मिना, सुभाष मसारकर, पुलगाव पोलिस निरीक्षक प्रमोद बानबले, सोनपितळे, जाधव, धम्मपाल मानकर, मेजर चुटे, फिरोजखान, दिनेश गोडस, परिषद नगर अग्निशमन दलाचे अजय चाटे, अविनाश जयदे, रेल्वे सुरक्षा बल, पुलगाव पोलीस, नगर परिषद अग्निशमन दल चमु हजर होती.

# शांतीग्राम येथ हरे कृष्ण पुजा आणि महानामयज्ञ कार्यक्रमाला भाग्यश्री आत्राम यांची उपस्थिती

**मुलचेरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील शांतीग्राम येथे १६ ते १८ फेब्रुवारी पर्यंत हरे कृष्ण पूजा व महानाम यज्ञ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी जि प अध्यक्ष तथा सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा ग्रामपंचायत सदस्य अमित मुजुमदार, सपन डे,लगाम चे सरपंच दिपक मडावी,उपसरपंच मधुकर गेडाम,हरे कृष्ण पूजा कमिटीचे अध्यक्ष सुजय मंडल, गोविंद विश्वास,सुशील खराती,विरांशू विश्वास,विकास घरामी,सनत मंडल,सुशांत बेपारी,आनंद रॉय, शंतिग्राम येथील ज्येष्ठ नागरिक तथा परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दरवर्षी शांतीग्राम येथे हरे कृष्ण पुजा आणि महानामयज्ञ कार्यक्रम घेतले जाते.यंदा १६ ते १८ फेब्रुवारी पर्यंत ही पूजा केली जात आहे. काल १६ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास घट स्थापना करण्यात आली.आज महणाम कीर्तन आणि उद्या याठिकाणी महाप्रसाद वितरण केले जाणार आहे.आज झालेल्या महणाम कीर्तन कार्यक्रमाला भाग्यश्री आत्राम यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले.स्थानिक बंगाली बांधवांनी मोठ्या उत्साहात हा कार्यक्रम साजरा केला होता. आगमन होताच कमिटी तर्फे पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात महिलांनी व युवतींनी यावेळी विविध धार्मिक नृत्य सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.यावेळी भाग्यश्री ताईंकडून बक्षीस देण्यात आले.तर हरेकृष्ण आणि महानाम यज्ञ कमिटीला ताईंनी आर्थिक मदतही केले.या दोन दिवसीय हरेकृष्ण महानाम यज्ञ कार्यक्रमात भजन कीर्तन सांस्कृतिक कार्यक्रम तसेच महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी लगाम,शांतिग्राम, दामपूर,येला,परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दहेगाव स्टेशन येथे विविध विकासकामाचे भुमिपूजन



**पुलगाव । प्रतिनिधी**

नजिकच्या दहेगाव स्टेशन येथे २५/१५ विशेष निधी योजने अंतर्गत, बरेच दिवसांची विद्यार्थीची,नागरिकांची मागणी लक्षात घेता,खा.रामदास तडस यांची विशेष प्रयत्नाने व सरपंच सौ.राजश्री गावंडे यांच्या वारंवार होत असलेल्या विनंती लक्षात घेता,दि.१६ ला स्वप्नपूर्ती झाली.

दहेगावं (स्टे.) येथे बस स्टॅन्ड करिता ५ लक्ष व दहेगावं (गावंडे) येथे सिमेंट रस्ता बांधकाम ५ लक्ष,या कामांचे भूमिपूजन विधानसभा निवडणुक प्रमुख राजेश बकाने ,भाजपा जिल्हाध्यक्ष सुनील गफाट , विधानसभा प्रमुख दिपक फुलकरी यांच्या प्रमुख उपस्थिती पार पडले यावेळी माजी प.स.सदस्य हेमचंद रंगारी ,भाजपा वर्धा तालुकाअध्यक्ष नंदू झोटिंग, महामंत्री गजानन दुतारे, भाजयुमो जिल्हा महामंत्री गौरव गावंडे, संजय गांधी निराधार समिती सदस्य वर्धा गौरव गावंडे ,दशरथ गजभिये उपसरपंच,सुधाकर गावंडे माजी सरपंच,सौ.अर्चना कंगाले माजी सरपंच,ग्रा.प.सदस्य सौ.मालू चौधरी, सौ.आशा कौराती,श्री.प्रशांत तुमडाम,सुरेश तुमडाम माजी प.स.सदस्य, अरुण डुकरे,श्री.होले सर ग्रामसेवक,सतिष मेटकर,.देवू दुबे,चंद्रकांत पदिले,वसंतराव बोरकर,नितीन चांदेकर,वैशाली तुमडाम,सीमा गावंडे,आशा भलावी,दुर्गा मसराम,अनिता गोडे,सुरेश तुमडाम,हनुमान उईके,आशिष गावंडे,भीमराम विरपाते, शिवम चिखलकार, प्रांजली गावंडे,शिवानी गावंडे,सुनीता मडावी,गणेश गावंडे,संजय गावंडे तसेच मोठ्या संख्येने गावकरी,महिला उपस्थित होते.

# शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पुरविण्याचा प्रयत्न–मंत्री धर्मराव बाबा आत्राम

**एटापल्ली । प्रतिनिधी**

प्रत्येक नागरिकाचे आरोग्य चांगले रहावे आणि वेळेवर उपचार पोहोचावेत या उद्देशाने 'संकल्प निरोगी महाराष्ट्राचा' हे ब्रीद वाक्य घेऊन समाजातील प्रत्येक घटकातील नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी केले.

एटापल्ली तालुका मुख्यालयात १६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान व ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमानाने आदिवासी भागातील रुग्णांना विशेष तज्ञांच्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'महाभव्य निशुल्क आरोग्य व दंत' शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सिनेट सदस्य तनुश्री ताई आत्राम, नगराध्यक्ष दिपयंती पेंदाम,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर,माजी जि प सदस्य नाना नाकाडे,माजी प स सभापती बेबीताई नरोटे,तहसीलदार हेमंत गांगुर्डे, उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम,संवर्ग विकास अधिकारी आदिनाथ आंधळे,बाल विकास अधिकारी विद्याधर बुरीवारे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. तुपेश उईके,तालुका आरोग्य अधिकारी डॉ सचिन कन्नाके आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना दुर्गम भागातील आदिवासी बांधवांना विविध मोठे आजारावर उपचार घेण्यासाठी शहराच्या ठिकाणी जाणे शक्य होत नाही.त्यामुळे या भागातील रुग्णांना विशेष तज्ज्ञांच्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठीच महा आरोग्य निशुल्क शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.याठिकाणी विविध आजारावर उपचार केले जाणार असून नागरिकांनी त्याचा पुरेपूर फायदा घ्यावा असे आवाहन देखील त्यांनी केले.या महाआरोग्य शिबिरात दंत चिकित्सा व उपचार, डोळ्याची तपासणी व मोतीबिंदूचे ऑपरेशन, कॅन्सर, मधुमेह,उच्च रक्तदाब व पक्षघात व इतर आजारांचे निदान व उपचार, स्त्रीरोग तपासणी, सोनोग्राफी व उपचार तसेच तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन व सल्ला देण्यात आला.शिबिरात एटापल्ली तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेतला.



# राज्यस्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धेत प्राची शेंडे या विद्यार्थीनीचे सुयश

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील तळोधी (बा.)येथील यादवराव पोशट्टीवार महाविद्यालयातील वाणिज्य शाखा बी.कॉम.भाग -३ ची विद्यार्थीनी कु.प्राची शेन्डे हीने नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या लौकिकात भर घातली आहे.

गोंडवाना विद्यापीठांतर्गत येत असलेल्या देसाईगंज वडसा येथील आदर्श कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नुकतेच राज्यस्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धेत यादवराव पोशट्टीवार महाविद्यालयातील वाणिज्य शाखा बी.कॉम.भाग -३ची विद्यार्थीनी कु.प्राची शेन्डे हिने दुसरा क्रमांक पटकाविला.कु.प्राची शेन्डे या विद्यार्थीनीने भृणहत्या हा विषय घेऊन दमदारपणे एकपात्री प्रयोग सादर केला.दरम्यान महाविद्यालयातर्फे प्राचीला ४ हजार १ रुपये रोख पारितोषीक,प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह



देऊन तिचा गौरव करण्यात आला.यावेळी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष संदीप पोशट्टीवार,प्राचार्य डॉ.पी. अरूणप्रकाश,सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.विलास वानखेडे,विद्यार्थी कल्याण समितीचे प्रमुख प्रा.उपेन्द्र चिटमलवार यांची उपस्थिती होती.यावेळी सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्राची शेन्डेचे अभिनंदन केले आहे.

# १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विविध उपक्रम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात आणि मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात येत आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करताना जबाबदार अधिकाऱ्यांनी प्रशासनाने दिलेल्या मुद्द्यांचा अंतर्भाव करून सर्वतोपरी प्रयत्न करावेत. उपक्रमा संदर्भात नियोजन करून अंमलबजावणी करण्याबाबत प्रशासनाने निर्देश दिले आहे.

यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसराची स्वच्छता, रंगरंगोटी व सुशोभीकरण करताना जबाबदार अधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून काम नियोजित पद्धतीने करून घ्यावे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या शेजारी/ परिसरात सुयोग्य ठिकाणी राज्य गीताचे फ्लेक्स लावावेत. स्थानिक नद्यांचे स्वच्छ व पवित्र पाणी उपलब्ध झाल्यास पुतळयास जलाभिषेक घालावा. पुतळा परिसरात सर्वत्र विद्युत रोषणाई करावी. शक्य झाल्यास परिसरात कायम स्वरूपी विद्युत रोषणाईचे नियोजन करावे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहाराबरोबरच कायमस्वरूपी मोत्याचा हार उपलब्ध झाल्यास तो घालावा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या दिवशी पुतळ्यासमोर उपलब्धतेनुसार पोलीस बँड (अर्धा तास) द्वारे राज्यगीत व शिवगीतांची धुन वाजवावी. पुतळा परिसरात आकर्षक रांगोळी काढण्यात यावी शक्य तेथे फुलाची रांगोळी काढावी. जयंतीच्या दिवशी स्थानिक शाहिरांच्या पोवाड्याचा कार्यक्रम आयोजित करावा. तसेच स्थानिक ठिकाणी निबंध स्पर्धा, वीर गीतांच्या स्पर्धेचे आयोजन करावे, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .